लोकमत

# प्रतीक्षा व्हणबट्टे यांना उपक्रमशील युवा पुरस्कार

## रविवारपासून चित्र-शिल्प प्रदर्शनाचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : रेखासम्राट टी. के. वडणगेकर यांच्या २२ व्या स्मृतिदिनानिमित्त रविवार (दि. १२ मार्च)पासून चित्र-शिल्प प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात के. आर. कुंभार उपक्रमशील युवा कलाकार पुरस्कार प्रतीक्षा व्हणबट्टे यांना देण्यात येणार आहे.

दसरा चौकातील राजर्षी शाहू स्मारक भवनच्या कलादालनामध्ये रविवारी सकाळी १०:३० वाजता प्रदर्शनाचे उद्घाटन होणार असून पुरस्कार वितरण शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी विद्यापीठ जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, चित्रकार डॉ. मानसिंग टाकळे, प्राचार्य अजेय दळवी यांची प्रमुख उपस्थिती आहे.

रेखासम्राट टी.के. वडणगेकर यांचे चित्रकला आणि मूर्तिकलेतील योगदान अलौकिक आहे. कलामंदिरच्या उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांनी अनेक कलाकार घडविले आहेत. त्यांच्या शिष्यांच्या वतीने २००१ पासून त्यांचा स्मृतिदिन साजरा केला जातो.

याप्रदर्शनात विजय टिपुगडे, प्रतीक्षा व्हनबट्टे, इंद्रजित बंदसोडे, बबन माने, गजेंद्र वाघमारे, आरिफ तांबोळी, संतोष पोवार, किशोर राठोड, नागेश हंकारे, शैलेश राऊत, पूनम राऊत, मनोज दरेकर, अभिजित कांबळे, मनीपद्म हर्षवर्धन, प्रवीण वाघमारे, विजय उपाध्ये, राहुल रेपे, विलास बकरे, शिवाजी मस्के, चेतन चौगुले आदींच्या कलाकृती मांडण्यात येणार आहेत. हे प्रदर्शन १८ मार्च पर्यंत सकाळी १०:३० ते रात्री ८:३० या कालावधीत खुले राहणार आहे.

द्वितीय पुण्यस्मरण

लोकमत

# विद्यापीठाच्या पदवीसह पदव्युत्तर परीक्षा सुरळीत सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२२ हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीत सुरू असून, काही परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. हिवाळी सत्रातील सुरळीत पार पडलेल्या पदव्युत्तर परीक्षांमध्ये मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन टीचर ट्रेनिंग एज्युकेशन, पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन मास कम्युनिकेशन एज्युकेशन या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या परीक्षेसाठी १३७५ उपस्थित होते. तर बुधवारी निकाल जाहीर झालेल्या पदवी परीक्षेमध्ये बीबीए (सेमिस्टर पाच, सहा), बीकॉम आयटी (सेमिस्टर तीन, चार), बीसीए, सीबीसीएस (सेमिस्टर पाच, सहा) या सहा अभ्यासक्रमांचा समावेश आहे.

सकाळ

# पर्यावरणशास्त्र अधिविभागातर्फे आज कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ८ : राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागामध्ये व्यवस्थापन विकास कार्यक्रमांतर्गत औद्योगिक सुरक्षाविषयक कार्यशाळा उद्या, गुरुवारी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत वनस्पतीशास्त्र विभागाच्या निलांबरी सभागृहात होईल. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, तर प्रमुख व्याख्याते म्हणून औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य खात्याचे संयुक्त संचालक सुरेश जोशी उपस्थित राहतील.

सकाळ

## विद्यापीठ

आजीवन अध्ययन व विस्तार विभागात सांगलीच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक निर्मला माने यांनी मार्गदर्शन केले. महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या वनिता पाटील, विभागाच्या डॉ. सुमन बुवा उपस्थित होत्या.

उद्योजकता विकास यावर महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राच्या वनिता पाटील यांनी मार्गदर्शन केले. वसंत सिंघन यांनी मनोगत व्यक्त केले.

सुषमा जाधव यांनी स्वागत केले. रवींद्र खैरे यांनी प्रास्ताविक केले. आसावरी कागवाडे यांनी परिचय करुन दिला. वैशाली गुंजेकर, गायत्री पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रियांका पाटील यांनी आभार मानले. आर. एम. जाधव, निखिल चव्हाण, अमर घाटगे, महेश नायकवडी उपस्थित होते. कॉमन फॅसिलिटी सेन्टरमध्ये प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी मार्गदर्शन केले. सुप्रिया साठे, सुमन सावंत, अश्विनी पाटील, आसिया जमादार यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. सोनकवडे यांच्याकडून भेटवस्तू दिल्या. अजित कांबळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. मकसूद वाईकर यांनी आभार मानले.

तरूण भारत

# विद्यापीठ अभ्यास मंडळ अध्यक्षपदाच्या निवडी जाहीर

- १५ अभ्यास मंडळे बिनविरोध
- ७ अभ्यास : मंडळासाठी निवडणूक तर ५ अभ्यास मंडळासाठी अर्ज न आल्याने रिक्त

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील विविध अभ्यास मंडळांच्या अध्यक्षांच्या निवडणुका पार पडल्या. विद्यापीठात २७ अभ्यास मंडळाचे गठण करण्यात आले आहे. यामध्ये १५ अभ्यास मंडळांच्या अध्यक्षांची निवडणूक बिनविरोध झाली. ७ अभ्यासमंडळासाठी प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेतून अध्यक्षांची निवड झाली. तर ५ अभ्यास मंडळासाठी एकाही पात्र उमेदवाराने अर्ज न भरल्याने ही पाच अध्यक्षपदे रिक्त आहेत.

गणित अभ्यास मंडळ डॉ. किशोर कुचे, प्राणीशास्त्र डॉ. सुनील गायकवाड, स्थापत्य अभियांत्रिकी डॉ. गुरू मुणवल्ली, औषध निर्माणशास्त्र डॉ. मनिष भाटिया, वाणिज्यशास्त्र डॉ. केदार मारूलकर, व्यवस्थापन डॉ. शर्वरी कुलकर्णी, लेखापरीक्षण डॉ. नंदकुमार कदम, व्यावसायिक अर्थशास्त्र डॉ. पी. एस. कांबळे, इंग्रजी तृप्ती करेकट्टी, अर्थशास्त्र जयवंत इंगळे, राज्यशास्त्र डॉ.



रविंद्र भणगे, इतिहास डॉ. चंद्रवदन नाईक, समाजशास्त्र डॉ. अर्चना कांबळे, शिक्षणशास्त्र डॉ. भरमू मर्जे, पत्रकारिता डॉ. किशा पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणुकीच्या माध्यमातून रसायन व रसायन तंत्रज्ञान डॉ. एस. एस. डेळेकर, इलेक्ट्रॉनिक्स डॉ. प्रशांत शाह, वनस्पतीशास्त्र डॉ. राजाराम गुरव, भूगोल व भूशास्त्र बाळासाहेब जाधव, संगणकशास्त्र डॉ. विजय घोरपडे, मराठी डॉ. रणधीर शिंदे, हिंदी डॉ. सातप्पा सावंत यांची निवड करण्यात आली.